**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा हवाईदल जवानांशी संवाद

- कृत्रिम वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या १०वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर / केंद्रीय शिक्षण मंडळाच्या १०वी, १२वी परीक्षांचे निकाल जाहीर

- आयपीएल क्रिकेट सामने येत्या शनिवारपासून पुन्हा सुरु होणार

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस दक्षिण अंदमान समुद्रात दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पंजाबमधे आदमपूर इथं हवाईदलाच्या तळाला भेट दिली आणि तिथं हवाई दलाच्या जवानांशी संवाद साधला. सेनादलांच्या जवानांबद्दल देशाला कृतज्ञता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आणि जवानांचं मनोबल वाढवलं. तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रधानमंत्र्यांना सद्यस्थितीविषयी सविस्तर माहिती दिली.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत देशाच्या पश्चिम सीमेच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीला संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान, नौदल प्रमुख ऍडमिरल दिनेश के त्रिपाठी, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी तसंच संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग हे उपस्थित होते.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या शोपियान जिल्ह्यातल्या शुकरू केल्लर वन विभागात संरक्षण दल आणि दहशतवादी यांच्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले. हे दहशतवादी लष्कर ए तैयबा किंवा द रेझिस्टन्स फ्रंट चे सदस्य असल्याची शक्यता काश्मीरचे पोलीस महानिरीक्षक व्ही के बिर्दी यांनी वर्तवली आहे.

दरम्यान जम्मू काश्मीर, राजस्थान आणि पंजाबमधल्या सीमावर्ती भागात परिस्थिती शांत असून जनजीवन पूर्वपदावर येत आहे. आज या भागातल्या शाळा सुरु झाल्या.

<><><><><>

कृत्रिम वाळू धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळाली. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती किंवा संस्थांना कृत्रिम वाळू युनिट स्थापन करण्यासाठी उद्योग विभाग सवलती देणार आहे. तसंच या युनिट्सना २०० रुपये प्रति ब्रास इतकी सवलतही मिळणार आहे.

राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातल्या उपकेंद्रासाठी नागपूर जिल्ह्यातल्या चिंचोली इथं सुमारे २० हेक्टर इतकी जागा द्यायचा निर्णय मंत्रिमंडळानं आज घेतला.

तसंच, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरतं पथक योजनेलाही राज्य मंत्रिमंडळानं हिरवा कंदील दाखवला. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात २९ महापालिका क्षेत्रांमध्ये ३१ मोबाईल व्हॅनसाठी सुमारे ८ कोटी रुपयांच्या खर्चालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना होम स्वीट होम अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजावरचं मुद्रांक शुल्क कमी करून फक्त एक हजार रुपये आकारायचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं घेतला.

राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवालही मंत्रिमंडळानं आज स्वीकारला. यापैकी ८० कोटी रुपयांचा भार राज्य सरकार स्वीकारणार आहे.

राज्यातल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचं सार्वजनिक-खासगी भागीदारीतून अद्ययावतीकरणासंदर्भातलं धोरण राज्य मंत्रिमंडळानं स्वीकारलं.

<><><><>

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आज निवृत्त होत आहेत. १० नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला होता. निवृत्तीनंतर आपण कोणतंही लाभाचं पद स्वीकारणार नाही असं खन्ना यांनी स्पष्ट केलं असून कायद्याच्या क्षेत्रात कार्यरत राहण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.

खन्ना यांनी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची शिफारस केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी याला मान्यता दिल्यानंतर गवई सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील.

<><><><>

'ऑपरेशन सिंदूर' बाबत जनजागृतीच्या उद्देशानं  भारतीय जनता पक्षानं आजपासून देशभरात जनजागृती मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेला त्यांनी 'तिरंगा यात्रा' असं नाव दिलं असून पाकिस्तानविरोधात भारतीय लष्करानं केलेल्या यशस्वी कारवायांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर आज संध्याकाळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे.

<><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल आज मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पुण्यात जाहीर केला. राज्याच्या नऊ विभागीय मंडळातून १५ लाख ४६ हजार ५७९ नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ जण उत्तीर्ण झाले आहेत.

गेल्यावर्षी पेक्षा यंदाच्या निकालात १ पूर्णांक ७१ शतांश टक्क्यांनी घट झाली आहे. यावर्षीही मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी ९६ पूर्णांक १४ शतांश टक्के इतकी आहे. तर ९२ पूर्णांक ३१ शतांश टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत.

यंदाही कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९८ पूर्णांक ८२ शतांश टक्के इतका आहे. तर सर्वात कमी निकाल हा नागपूर विभागाचा लागला आहे.

विभागनिहाय टक्केवारीत **पुणे विभाग** -९४ पूर्णांक ८१ शतांश, **नागपूर** - ९० पूर्णांक ७८ शतांश, **छत्रपती संभाजीनगर** ९२ पूर्णांक ८२ शतांश, **मुंबई** ९५ पूर्णांक ८४ शतांश, **कोल्हापूर** - ९६ पूर्णांक ७८ शतांश, **अमरावती** - ९२ पूर्णांक ९५ शतांश, **नाशिक** - ९३ पूर्णांक ०४ शतांश, लातूर - ९२ पूर्णांक ७७ शतांश टक्के इतका निकाल लागला आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआयनं आयपीएल स्पर्धेचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. या वेळापत्रकानुसार येत्या शनिवारी म्हणजे १७ मे पासून पुन्हा एकदा आयपीएल स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या दिवशी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि कोलकता नाईट रायडर्स संघांमध्ये बेंगळुरू इथं सामना होईल. तर ८ मे रोजी धरमशाला इथं पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स संघांमध्ये अर्ध्यावर सोडलेला सामना आता २४ मे रोजी जयपूरला होणार आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ९ मे पासून आयपीएलचे उर्वरीत सामने स्थगित केले होते. आता पुन्हा एकदा हे सामने खेळले जाणार आहेत.

**<><><><><>**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ८९ पदकांसह पदकतालिकेतलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. यात ३८ सुवर्ण, २६ रौप्य

आणि २५ कांस्यपदकांचा समावेश आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्र पदकतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. या स्पर्धेचा आजचा दहावा दिवस असून आज झालेल्या जिमनॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या परिना हिने सुवर्णपदक जिंकलं आहे. याच स्पर्धेत महाराष्ट्राच्या देवांगी पवार हिने कांस्य पदकाची कमाई केली आहे. बॉल जिमनॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या किमया कारळे हिने सुवर्ण पदक जिंकलं असून परिनाला रौप्य पदक मिळालं आहे.

<><><><>

केंद्रीय शिक्षण मंडळाच्या १० वी १२ वी च्या परीक्षेचा निकालही जाहीर झाला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे.

<><><><>

बुलढाणा जिल्ह्यात नांदुरा इथं आज पहाटे झालेल्या रस्ता अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला, तर अन्य ४ जण जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर एक एर्टीगा गाडी समोरुन येणाऱ्या ट्रकवर आदळल्यानं हा अपघात झाला. गाडीतल्या ३ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. जखमींवर खामगावच्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

<><><><>

नैर्ऋत्य मोसमी पावसाने बंगालच्या उपसागरातला दक्षिण भाग व्यापला असून दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटं आणि उत्तर अंदमान सुद्राच्या काही भागात तो पोहोचला आहे. पुढच्या  ३-४ दिवसात मान्सून आणखी पुढे सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

कोकणात उद्या सकाळपर्यंत विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा तसंच हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस अपेक्षित आहे. मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात पुढचे तीन दिवस तुरळक ठिकाणी विजांचा

कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा तसंच हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या पूर्व उपनगरात सकाळी नऊ वाजल्यापासून अवकाळी पावसाच्या जोरदार सरी पडल्या. भारतीय हवामान विभागानं आज आणि उद्यासाठी यलो अलर्ट जारी केला असून, शहरात वादळी वारे, गडगडाट, आणि हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने मुंबईत अवकाळी पावसाला सुरुवात झाल्याची माहिती हवामान खात्याने दिली.

**जालना** शहरासह जिल्ह्यातल्या काही भागात काल सायंकाळी पावसानं हजेरी लावली. भोकरदन आणि अंबड तालुक्यात अर्धातास जोरदार पाऊस झाला. भाटेपुरी इथं एका शेतकऱ्याचा अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला.

**//<><><><><>//**